# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक क्र. एनजीसी २००९/ (२४३/०९) - युनि - १, दिनांक १२/०८/२००९ अन्वये सहावा वेतन आयोग लागू केला आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०११/(२५/११) विशि - १, दिनांक १५/०२/२०११ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील तरतूदी स्विकारण्यात आल्या आहेत. या अधिसूचनेतील तरतुदीनुसार शिक्षकांनी त्यांचे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल (Annual Self-assessment for the Performance Based System **(PBAS)**)सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २००७/प्र. क्र. ३३/१७ विशि - १, दिनांक ०४/०३/२०१७ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० रोजीच्या अधिसूचनेतील तिसरी व चौथी सुधारणा स्विकारली आहे. या सुधारणा शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने स्विकारल्या आहेत. सुधारणेनुसार वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवालाचा नमुना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक आस्थापना/पीजी/४०१२, दिनांक २१/१२/२०१७ अन्वये सर्व शिक्षकांनी त्यांचे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल भरून सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, अद्यापी काही शिक्षकांनी त्यांचे सन २०१६-२०१७ चे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल सादर केलेले नाहीत.

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण - १०१३/ प्र. क्र. ५५/ कोषा प्र - ५, दिनांक ०९/०७/२०१३ व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण - १०१३/ प्र. क्र. ५५/ कोषा प्र - ५, दिनांक १२/०९/२०१३ अन्वये गोपनीय अहवाल विहित वेळापत्रकानुसार (३० जून पूर्वी ) लिहण्याची जबाबदारी पार न पाडणाऱ्या प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्याची त्या वर्षातील दिनांक ०१ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ नामंजूर करण्याची तरतूद आहे.

तेंव्हा याव्दारे कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांनी त्यांचे सन २०१६-२०१७ चे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल सादर केलेले नाहीत ते त्यांनी तात्काळ सादर करावेत. तसेच सर्व शिक्षकांनी सन २०१७-२०१८ चे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल दिनांक २१/०७/२०१८ पूर्वी विभागप्रमुखांमार्फत सादर करावेत. वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल सादर न केल्यास वरील परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल व याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षक व विभाग प्रमुख यांची राहील. तसेच येथून पुढे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल वेळेत सादर करावेत, याबाबत पुन:श्च/ वारंवार कळविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ज्या शिक्षक / शिक्षक समकक्ष पदांचा वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवालाचा नमुना तयार होवून प्रसिध्द करण्यात आलेला नाही, त्या शिक्षक/ शिक्षक समकक्ष पदावरील शिक्षक/ शिक्षक समकक्ष सेवकांनी त्यांचे वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल नमुना तयार होवून प्रसिध्द करण्यात आल्यानंतर सादर करावेत.

**आदेशावरून**

**कुलसचिव** 13/7

**सं. क्र. आस्थापना/पीजी/** 4905
**दिनांक : १३/०७/२०१८**

प्रति,

अधिविभाग प्रमुख/ संचालक/ समन्वयक, सर्व अधिविभाग/ अभ्यासक्रम - यांनी सदरचे परिपत्रक संबंधितांच्या निदर्शनास आणावे व आवश्यक सूचना देवून कार्यवाही करावी.